# निशाण क्र. १९ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज स. नं. १८अ हि. नं. ३० व स. नं. १४अ हि. नं. १/४७ यामिळकती दाव्यातून वगळणेत यावा याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार सदरच्या मिळकती वादी प्रतिवादींच्या वडिलोपार्जित आहेत. सदर मिळकतीमध्ये बरेच सह हिस्सेदार आहेत पैकी काही हिस्सेदार मयत आहेत. त्यामुळे सर्व सहहिस्सेदारांना तसेच वारसांना याकामी पक्षकार करावयाचे झाल्यास बराच विलंब होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदरचा अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. अर्जात नमूद केलेल्या मिळकतींमध्ये दाव्यात नमुद केलेले व इतर घर इमले उभे आहेत. त्यामुळे संपुर्ण पक्षकारांना दाव्यामध्ये समाविष्ठ केल्याशिवाय दावा चालविणेस पात्र नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीस संधी देवून देखील वादीने युकतीवाद केला नाही. प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी. एस. रानडे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तूतचा दावा हा वाटप व पृथक कब्जा करता दाखल केलेला आहे. वाटपाच्या दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्या संपुर्ण वडिलोपार्जित मिळकती समाविष्ठ असणे

गरजेचे असते. तसेच प्रतिवादीच्या कथनानुसार दावा घर इमले वर नमुद दोन्ही मिळकतींमध्ये आहेत. त्यामुळे वर नमुद दोन्ही दावा मिळकती या दाव्यात समाविष्ठ असणे योग्य व उचित दिसते. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात दावा मिळकतीचे सरस व निरस मानाने वाटप होवून शकेल. सबब वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

स्थळ: देवगड
( बी. आर. पाटील )

दिनांकः २०/१०/२०२१
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.